महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मुंबई मधील जुन्या आणि मोडकळीस आलेल्या जीर्ण इमारती पाडण्यास संबंधीत महानगरपालिका प्रशासन अपयशी ठरत असल्याबाबत

(१) २३ (२३-१२-२०१४). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मधील जुन्या आणि मोडकळीस आलेल्या जीर्ण इमारतीमध्ये राहणा-या रहिवाशांवर मृत्यूची टांगती तलवार लटकत असल्यामुळे इमारती पाडण्यास संबंधीत महानगरपालिका प्रशासन अपयशी ठरत असल्याने शासनाने त्यावर कोणती कार्यवाही केली याची माहिती उच्च न्यायालयाने विचारल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील मोडकळीस आलेल्या इमारती पाडण्यास टाळाटाळ करणाऱ्या महानगरपालिका अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कारवाई होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :(१) मुंबईमधील जुन्या आणि मोडकळीस आलेल्या जीर्ण इमारती पाडण्यास संबंधित महानगरपालिका प्रशासन अपयशी ठरत आहे हे खरे नाही. तथापि धोकादायक व जीर्ण इमारतीमध्ये वास्तव्य करीत असलेल्या रहिवाशांना बाहेर काढण्याकरिता थेट तरतूद मुंबई महापालिका अधिनियम १८८८ मध्ये नाही. धोकादायक इमारतींवर कारवाई करण्याकरिता कार्यपध्दती ठरवून देण्याच्या मागणीच्या अनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्रमांक ११३५/२०१४ दाखल करण्यात आली होती. त्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय यांनी दिनांक

२३.०६.२०१४ रोजी अतिधोकादायक इमारतीत वास्तव्य करीत असलेल्या रहिवाशांना इमारतीमधून बाहेर काढण्याचे पोलीस विभागाला निर्देश दिले आहेत. तद्नंतर सदर इमारती निष्कासित करण्याचे निर्देश महापालिकेस देण्यात आले आहेत. त्याप्रमाणे महानगरपालिकेकडून कारवाई करण्यात येत आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील भायखळा येथील जिजामाता उद्यानाचे नुतनीकरण करण्याबाबत

(२) २७ (२३-१२-२०१४). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालिदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भायखळा येथील जिजामाता उद्यानाच्या नुतनीकरणाचा प्रकल्प प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१४ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भायखळा येथील जिजामाता उद्यानाचे नुतनीकरणाचा प्रकल्प प्रलंबित असण्यामागील कारणे काय व सदर प्रकल्प लवकरात लवकर सुरु करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :(१) व (२) हे खरे नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेने वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालयाचा सुधारित बृहत् आराखडा एच.के.एस. डिझायनर ॲण्ड कन्सल्टंट इंटरनॅशनल कंपनी लिमिटेड, थायलंड यांच्यामार्फत तयार करुन घेण्यात आला आहे. सदर सुधारित बृहत् आराखड्यास केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाच्या तांत्रिक समितीने दिनांक ०५.१२.२०१२ रोजी अंतिम मंजुरी प्रदान केली आहे. या प्राणिसंग्रहालयाच्या मंजुर बृहत् आराखड्यानुसार करावयाचा विकास माहे डिसेंबर, २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

सदर उद्यान व प्राणिसंग्रहालयाच्या पुढील विकासासाठी करण्यात आलेल्या कामांपैकी अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण व प्राणी इस्पितळ इमारतीचे बांधकाम ही कामे पूर्ण करण्यात आली आहेत. क्वारंटाईन एरिया व प्राणिसंग्रहालय शिक्षण केंद्र यांच्या इमारतींचे बांधकाम सुमारे ९५% पूर्ण झाले असून, सदर शिक्षणकेंद्राच्या आंतररचनेच्या कामांसाठी निविदा प्रक्रिया करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालयाच्या परिसरातील पुरातन वास्तूंचे जतन करण्यात येणारी कामे सुमारे ८०% पूर्ण करण्यात आली आहेत.

माहे डिसेंबर २०१४ अखेरपर्यंत तरस, वाघ, बिबळ्या, बारशिंगा, कोल्हा, लांडगा इत्यादी एकूण २४ प्राण्यांच्या पिंजऱ्यांच्या संकल्पचित्रांना सदर प्राधिकरणाकडून अंतिम मंजुरी प्राप्त झाली आहे. केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी मंजुर केल्याप्रमाणे प्राण्यांच्या पिंजऱ्यांच्या/आवासस्थानांचे बांधकाम करण्याकरिता निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली असून

महापालिकेच्या विकास व नियोजन खात्याकडून सदर निविदेकरितेच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात येत आहे. सदर पिंजऱ्यांची बांधकामे करण्याकरिता ई-निविदा लवकरच मागविण्यात येतील. एन्ट्री प्लाझाच्या विकासाकामाकरिता निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

सदर उद्यान व प्राणीसंग्रहालय परिसरामधील अंतर्गत बागांच्या विकासकामांसाठी विकास आराखडे तयार करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. अभ्यगतांसाठी पाणपोई, प्रसाधनगृहे, विश्रांतीस्थळे, फूड किऑस्क्स इत्यादी सुविधा तयार करण्यासाठीचा प्रस्ताव मुंबई पुरातन वास्तूजतन समितीकडे माहे फेब्रुवारी २०१४ मध्ये मंजुरीसाठी पाठविण्यात आला असून सदर बाबतीतील मंजुरी अद्याप प्रलंबित आहे.

सदर उद्यान व प्राणीसंग्रहालय परिसरामधील अंतर्गत पाणीवाटप यंत्रणेचे नुतनीकरण करण्यात येत असून त्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जल विभागातर्फे सर्वेक्षण करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पवई (मुंबई) येथील मिठी नदीवरील जयभिम नगर व मोखरजी नगर येथील अस्तित्वात असलेल्या दोन्ही पादचारी पुलांची अवस्था धोकादायक होवून मोडकळीस आल्याबाबत

(३) ६७ (२३-१२-२०१४). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगदपुरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवई (मुंबई) येथील मिठी नदीवरील जयभिम नगर व मोखरजी नगर येथील अस्तित्वात असलेल्या दोन्ही पादचारी पुलांची अवस्था धोकादायक होवून मोडकळीस आल्याने सदर ठिकाणी नवीन पादचारी पुलांची निर्मिती करण्याबाबत परिसरातील नागरीकांनी संबंधितांची वारंवार मागणी करण्यात येवूनही अद्यापी नवीन पादचारी पुलांचे बांधकाम करण्यात आले नसल्याचे माहे आक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठिकाणी नवीन पादचारी पुल बांधण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर कामासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या व त्याद्वारे लघुत्तम देकार असणाऱ्या मेसर्स देव इंजिनिअर्स या ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आली असून दिनांक ३१.१२.२०१४ रोजी ठेकेदारास कार्यादेश देण्यात आलेले आहेत व काम सुरु करण्यात येत आहे.

सहाय्यक आयुक्त, केडीएमसी यांचेवर रॉकेल ओतून जिवंत जाळण्याचा गुंडानी केलेला प्रयत्न

(४) ७२ (१५-०१-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण जि. ठाणे अनाधिकृत बांधण्यात करण्यात आलेल्या कामावर कारवाई करण्यासाठी गेलेल्या केडीएमसीचे सहाय्यक आयुक्त यांचेवर रॉकेल ओतून त्यांना जिवंत जाळण्याचा गुंडानी प्रयत्न करण्यात आल्याचा प्रकार माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास आढळून आला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) :(१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी तीन आरोपींविरुध्द टिळकनगर पोलीस स्टेशन गुरक्र. ११८/१४ भादंवि कलम ३०७, ३५३, ३०९, व ३४ प्रमाणे दिनांक २३.०९.२०१४ रोजीदाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी आरोपींविरुध्द दिनांक ०८.०१.२०१५ रोज मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले असून, सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्हयात बालकांची तपासणी रखडली असल्याबाबत

(५) ८२ (२२-१२-२०१४). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात राष्ट्रीय बालसुरक्षा अभियानाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेतून कमी करण्यात आल्याने तसेच डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली नसल्याने बालकांची तपासणी रखडली असल्यामुळे बालकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास आढळून आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास बालकांवर उपचार होण्यासाठी व त्यांचे आरोग्य सुरक्षित राहण्यासाठी कमी करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेत घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१५) :(१) हे खरे नाही.

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत कार्यरत असणारे कंत्राटी वैद्यकीय अधिकारी संपात सहभागी झाल्याने कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात आले होते. तथापि आरोग्य तपासणीवर कोणताही विपरीत परिणाम होऊ नये. यास्तव या काळात जिल्हयातील अन्य स्थायी व अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून बालकांची तपासणी करुन घेण्यात आली.

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत माहे एप्रिल, २०१४ ते सप्टेंबर, २०१४ पर्यंत रत्नागिरी जिल्हयातील अंगणवाडीमधील एकूण ६८१०१ बालकांची आणि शाळेतील ७५५९६ विद्यार्थ्यांची असे एकूण १४६६९७ मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आलेली आहे.

(२) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक १९.११.२०१४ रोजीच्या आदेशानुसार राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत रत्नागिरी जिल्हयातील एकूण ४४ वैद्यकीय अधिकाऱ्यांना कामावर रुजु करुन घेण्यात आले असून शाळांमधील तपासणी कार्यक्रम यशस्वीपणे राबविली जात आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार व सेवा प्रवेश नियमांतील तरतूदीनुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी सेवते घेणे शक्य नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेने पाणी टंचाईवर राबविलेली वर्षा जलसिंचन योजना

(६) ११३ (२३-१२-२०१४). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत चार वर्षापूर्वी निर्माण होणा-या तीव्र पाणी टंचाईवर महानगरपालिकेने शाळा, रुग्णालय, महानगरपालिका कार्यालय, उद्याने तसेच अन्य कार्यालयाच्या इमरतीत पावसाच्या साठा करण्यासाठी महानगरपालिकेने राबविलेली वर्षा जलसिंचन योजना कोणत्याही ठिकाणी दिसून येत नसून या योजनेकरीता काम न करताच लाखो रुपये हडप करण्यात आले असल्याचे माहे जुलै, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासन चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, या मागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने चार वर्षांपूर्वी शाळा, रुग्णालये बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालये तसेच उद्याने या ठिकाणी वर्षा जलसिंचन योजना कोणत्याही ठिकाणी न करताच लाखो रुपये हडप करण्यात आली ही गोष्ट खरी नाही. सन २००९-२०११ या कालावधीत तीव्र पाणी टंचाईच्या काळात वर्षा जल संचयन व विनियोगाचे प्रकल्प बृहन्मुंबई महानगरपालिका शाळा, रुग्णालये व उद्याने अशा ठिकाणी हाती घेण्यात आले होते. सदर प्रकल्पांच्या जागांची माहे सप्टेंबर, २०१४ पुन्हा पाहणी करण्यात आली व सर्व

ठिकाणी वर्षा जल संचयन व विनियोगाची कामे पूर्ण केलेली आढळली. परंतु, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभाग कार्यालयाच्या परिसरात वर्षा जल संचयन व विनियोगाचा प्रकल्प राबवित आलेला नाही. सदर ठिकाणी प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने विभाग कार्यालयातील अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. सदर चर्चेमध्ये हा प्रकल्प राबविण्याने विभाग कार्यालयाच्या आवारात अधिकाऱ्यांची तसेच माननीय नगरसेवकांची वाहने उभी करणे तसेच कार्यालयाच्या आवारातील वाहनांच्या चलन वलनावर परिणाम होईल म्हणून चर्चेअंती विभाग कार्यालयाच्या परिसरात वर्षा जल संचयन व विनियोग प्रकल्प राबवू नये असे ठरविण्यात आले. तसेच के/पूर्व विभागातील शहाजी राजे म्युनिसिपल शाळा येथे अस्तित्वात असलेल्या मोठ्या वृक्षांमुळे या ठिकाणचा प्रकल्प रद्द करण्यात आला. सदर दोन्ही ठिकाणी न केलेल्या कामांचे कुठलेही अधिदान कंत्राटदारास करण्यात आलेले नाही. जल अभियंता विभागाने ज्या ठिकाणी वर्षा जल संचयन व विनियोगाची कामे केली होती ती संबंधित खात्याकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहेत. या कामांचे परिरक्षण/विनियोग संबंधित खात्याने करावयाचे आहे. त्यासाठीच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. वर्षा जल संचयन व विनियोग प्रकल्प राबविल्यानंतर संबंधित ठिकाणच्या भूगर्भातील जलपातळीत वाढ होते.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई-ठाणे शहराला पाणीपुरवठा करणा-या तानसा जलाशयाच्या संरक्षित जलस्त्रोत सुधारणेच्या कामांकडे मुंबई महानगरपालिकेने दुर्लक्ष केले असल्याबाबत

(७) ११४ (२३-१२-२०१४). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई - ठाणे शहराला पाणीपुरवठा करणा-या तानसा जलाशयाच्या संरक्षित जलस्त्रोत सुधारण्याच्या कामांकडे मुंबई महानगरपालिकेने दुर्लक्ष केले असल्याचे माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तलावाचे जलस्त्रोत व नैसर्गिक पाणवहळ, पाणवठे, पाणी स्त्रोत या जागी छोटे बंधारे, दगडी सिमेंट बांध, धूपप्रतिबंधक चर आदि कृत्रिमरित्या सुधारीत कामे करण्याच्या दृष्टीने वन्यजीव विभागाने मुंबई मनपाने पाच वर्षाचा आराखडा प्रस्तावित केला होता व त्यानुसार २०११ - १२ या वर्षात निधी देण्यात आला परंतू त्यानंतर पालिकेने विभागाच्या खर्च प्रमाणपत्र व इतर प्रक्रियात्मक पूर्ण न केलेली बाब समोर ठेवून निधी खर्च दिला नसल्याने शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :(१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र शासनाच्या राज्य सरोवर योजनेंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तानसा व मोडकसागर धरणाच्या पाणलोट क्षेत्राच्या विकास करण्याकरिता सन २००८-०९ ते सन २०१२-१३ या ५ वर्षांच्या कालावधीमध्ये वन विभागास विकास कामे करण्याकरिता लागणारा

आवश्यक तो वर्षनिहाय एकूण रु.५,२१,०१,८००/- इतका ग्रामीण निधी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार होता. वन विभागाने केलेल्या मागणीनुसार आतापर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेने रु.८०,००,०००/- एवढा निधी वनविभागास उपलब्ध करुन दिला आहे. त्यापैकी दिनांक ३१.०३.२०१३ पर्यंत वन विभागाने एकूण रु.७९,७३,५९९/- एवढ्या रक्कमेची विकास कामे केली. सदर कामे व कामाची प्रगती वाढविण्याबाबत महानगरपालिकेने वेळोवेळी वन विभागास कळविले आहे. परंतु उर्वरित विकास कामे करण्यासाठी अग्रीम निधीची कोणतीही मागणी विहीत मुदतीत न आल्यामुळे महानगरपालिकेने निधी उपलब्ध करुन दिला नाही. तथापि, वन विभागाने उर्वरित व वाढीव निधीची मागणी केल्यामुळे त्यास स्थायी समितीची मान्यता मिळाल्यानंतर उर्वरित अग्रीम निधी वन खात्यास प्रदान करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्हयात राष्ट्रीय सणांच्या कार्यक्रमांना सर्व शासकीय कर्मचा-यांना उपस्थित राहणे अनिवार्य असल्याबाबत

(८) १३४ (२२-१२-२०१४). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात सावली तालुक्यातील मेहा बूज येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गेल्या तीन वर्षात माहे १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी राष्ट्रीय सणांच्या कार्यक्रमांना सर्व शासकीय कर्मचा-यांना उपस्थित राहणे अनिवार्य असताना एकाही उपक्रमात सहभागी झाले नसल्याचे माहे ६ सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील मुख्याध्यापकावर कारवाई करण्याची मागणी येथील ग्रामस्थाकडून होत आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१०-०७-२०१५) :(१) हे खरे आहे,

(२) व (३) चंद्रपूर जिल्हा परिषदेतील सावली तालुक्यातील मेहाबुज येथील उच्च प्राथमिक शाळेचे मुख्याधपक हे सन २०१३-२०१४ मध्ये २६ जानेवारी आणि २०१४-२०१५ मध्ये १५ ऑगस्ट या राष्ट्रीय सणांच्या कार्यक्रमास गैरहजर होते. याबाबत अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती मेहाबुज यांनी दिनांक १९.८.२०१४ रोजी तक्रार केली आहे. या तक्रारीवरुन पंचायत समिती सावली यांच्या स्तरावर चौकशी करण्यात आली आहे. चौकशीअंती दिनांक २०.८.२०१४ रोजी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, सावली यांनी मुख्यध्यापक श्री.आर.डी.निरगुंडे यांची एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न होत थांबविण्याची कारवाई केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली जिल्हयातील कळमनुरी तालुक्यातील लघुसिंचन जलसंधारण विभागाच्या कामाचे आदेश काढूनही अद्याप सदर कामे सुरु न केल्याबाबत

(९) १३८ (२२-१२-२०१४). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील कळमनुरी तालुक्यातील लघुसिंचन जलसंधारण विभागाची कामे कार्यकारी अभियंता लघुसिंचन जलसंधारण, नांदेड यांनी दिनांक २० मे, २०१४ रोजी मे.एम.एस.कन्स्ट्रक्शन प्रा.लि. जळगांव यांच्या नावे कामाचे आदेश काढण्यात आले होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्याप सदर काम सुरु न करण्यामागील कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर कंपनीची कामाचे आदेश रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१०-०७-२०१५) :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सन २०१४ मध्ये पावसाळ्यामुळे कामाची सुरुवात झाली नाही. सदर योजनांची कामे पूर्ण करण्याचा कालावधी २४ महिने असून निविदा मुदत दिनांक १९ मे, २०१६ रोजी संपुष्टात येत आहे. कामे सुरु करण्यासाठी निविदेतील तरतुदीनुसार कंत्रटादारावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहर विभागातील एक इमारत मागील वर्षी एक कोटी रुपये खर्च करुन दुरुस्त केली असतानाही मुंबई महानगरपालिकेने ती धोकादायक ठरवून त्यातील रहिवाशांना घरे तात्काळ सोडण्याच्या नोटीसा बजावल्या असल्याबाबत

(१०) १८५ (२३-१२-२०१४). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर विभागातील एक इमारत मागील वर्षी एक कोटी रुपये खर्च करुन दुरुस्त केली असतानाही मुंबई महानगरपालिकेने ती धोकादायक ठरवून त्यातील रहिवाशांना घरे तात्काळ सोडण्याच्या नोटीसा बजावल्या असल्याचे माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दक्षिण मुंबईतील सदरहू इमारतीची गेल्या वर्षी एक कोटी रुपये खर्च करुन संरचनात्मक दुरुस्ती करण्यात आली होती तसेच महानगरपालिकेच्या "इ" विभागातील पठारे मार्केटच्या इमारतीबाबत व इतर अनेक इमारतींची पाहणी न करता तेथील रहिवाशांना घरे तात्काळ सोडण्याच्या नोटीसा मुंबई महानगरपालिका देत असल्याने तेथे वास्तव्य करणा-या

रहिवाशांना नाईलाजास्तव मुंबईबाहेर स्थलांतर करावे लागत आहे हे पाहता शासन त्वरीत या प्रकरणी चौकशी करुन आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :(१) हे खरे नाही.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'ई' विभागातील मदन गोविंद पाठारे या मंडईचे संरचनात्मक सल्लागार व महानगरपालिकेच्या तांत्रिक समितीद्वारे परिरक्षण करण्यात आले. महानगरपालिकेच्या तांत्रिक समितीच्या अहवालानुसार, सदरची मंडई दुरुस्ती करण्यास प्रस्ताविले व बाह्य दुकान क्रमांक ४ ते १० धोकादायक असल्याचे कळविले, त्यानुसार सदर गाळेधारकांची/अनुज्ञापत्रधारकांची पर्यायी व्यवस्था नजीकच्या मंडईत करुनच त्यांना स्थलांतरीत करण्याचे आदेश बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेले होते. परंतु सदर गाळेधारक पर्यायी जागेत अद्याप स्थलांतरीत झालेले नाहीत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राजापूर (ता. जि.रत्नागिरी) येथे नगरोत्थान योजनेतून सुमारे पन्नास लाख खर्च करुन बांधण्यात आलेल्या बांधी उन्हाळी हंगामात खचली असल्याबाबत

(११) २४५ (२३-१२-२०१४). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (ता.जि.रत्नागिरी) येथील दिवटेवाडीतील सागवेकर घराजवळ नगरोत्थान योजनेतून सुमारे पन्नास लाख रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या बांधी उन्हाळी हंगामात खचली असल्याचे माहे जून, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारणास्तव वाहनचालक व नागरिकांची गैरसोय होत आहे हे पाहता शासन त्वरीत कायमस्वरुपी उपाययोजना करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :(१) सागवेकर घराजवळील बांधी उन्हाळी हंगामात खचलेली नाही. पावसाळ्यात सदर बांधीच्या कडेने मातीने केलेला भराव दबलेला होत, तो राजापूर नगरपरिषदेकडून पुर्ववत करण्यात आलेला असून, बांधी सुस्थितीत आहे. सागवेकर घराजवळील बांधीचे पहिल्या टप्प्यातील व दुस-या टप्प्यातील दोन्ही कामे राजापूर नगर परिषदेकडून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत पूर्ण झालेली असून सदर रस्ता रहदारीस खुला करण्यात आलेला आहे.
(२) आजतागायत वाहतूकीबाबत कोणतीही तक्रार राजापूर नगर परिषदेकडे आलेली नाही व कोणतीही गैरसोय वाहनचालक व नागरीकांची झालेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या जी-दक्षिण विभागातील सीताराम मिल कंपाऊंड येथील शाळेत विद्यार्थी शिक्षण घेत असताना शाळेची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली असल्याबाबत

(१२) २८० (२३-१२-२०१४) श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा-कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगांव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या जी-दक्षिण विभागातील सीताराम मिल कंपाऊंड येथील शाळेत सद्य:स्थितीत ४३० विद्यार्थी शिक्षण घेत असताना शाळेची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर शाळेची दुरावस्था सुधारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पाहणी करण्यात आली आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांचे पायाभूत सुविधा कक्षातर्फे नेमणुक केलेल्या प्रकल्प सल्लागारामार्फत संरचनात्मक परिक्षण केले असून, सल्लागारांच्या निष्कर्षानुसार सदर शाळेच्या संरचनात्मक दुरुस्ती व दर्जोन्नती प्रस्तावित केली आहे. त्यानुसार मोठ्या संरचनात्मक दुरुस्तीचा व दर्जोन्नतीचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

सांगली महानगरपालिकेमार्फत करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्यास डिजिटल मिटरमुळे मोठ्या प्रमाणात बिले येत असल्याबाबत

(१३) २८१ (२३-१२-२०१४). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगांव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली महानगरपालिकेमार्फत करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्यास डिजिटल मिटरमुळे मोठ्या प्रमाणात बिले येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना जादाचा भुर्दंड पडू नये म्हणून शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१५) :(१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरासह जिल्ह्यातील २० पैकी ११ नेत्रपेढ्यांनी गत ३ वर्षात एकही नेत्रसंकलन केले नसल्याबाबत

(१४) ४३८ (२२-१२-२०१४). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरासह जिल्ह्यातील २० पैकी ११ नेत्रपेढ्यांनी मागील ३ वर्षात एकही नेत्रसंकलन केले नसल्याचे दिनांक १ नोव्हेंबर, २०१४ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील काही महिन्यांपासून आरोग्य विभागाने नेत्रपेढ्यांच्या निकषांमध्ये बदल केल्यामुळे शहरातील काही नेत्रपेढ्यांच्या परवान्यांचे नूतनीकरण होऊ शकले नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, समपदेशक आणि तंत्रज्ञ अशा स्वतंत्र पदाची तरतूद बदललेल्या निकषांमध्ये असल्याने लहान नेत्रपेढयांना परवान्याचे नूतनीकरण करता आले नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

डॉ. दीपक सावंत (०२-०७-२०१५) :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा अंतर्गत नवीन व नुतनीकरणाची नोंदणी केली जाते. या कायद्या अंतर्गत नेत्रपेढ्यांच्या नुतनीकरणासाठी कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तथापि काही संस्थांनी नुतनीकरण प्रस्ताव सादर न केल्यामुळे व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली नसल्यामुळे नुतनीकरण होऊ शकले नाही.
(३) हे खरे नाही.
(४) नुतनीकरण प्रस्ताव सादर करण्याबाबत व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत संबंधित नेत्रपेढ्यांना कळविण्यात आले आहे.

सीआरझेड नियमावली येणा-या झोपडयांचा पुनर्विकास करण्यासाठी शासनाने म्हाडा प्राधिकराणाची नोडल एजन्सी म्हणून नेमणुक केल्याबाबत

(१५) ४९९ (२३-१२-२०१४). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सीआरझेड नियमावली येणा-या झोपडयांचा पुनर्विकास शासनाने म्हाडा प्राधिकराणाची नोडल एजन्सी म्हणून नेमणुक केल्याचे दिनांक ९ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे,

(२) असल्यास म्हाडाने सदरील झोपडपट्टयांच्या पुनर्विकासासाठी काय योजना तयार केली आहे,
(३) असल्यास, शासनाने सदरील योजना म्हाडातर्फे प्रभावीपणे राबविण्यासाठी नवीन नियमावली तयार केली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता (०२-०७-२०१५) :(१) हे खरे नाही.
(२) व (३) नाही.
(४) केंद्रीय पर्यावरण विभागाच्या दिनांक ६ जानेवारी, २०११ च्या अधिसुचनेमध्ये सीआरझेड क्षेत्रातील पुनर्वसन योजनेत शासनाचा किंवा शासनाच्या अधिपत्याखालील संस्थाचा ५१% कमी नसेल एवढा वाटा असावा अशी तरतुद आहे. परंतु या तरतुदीमुळे सीआरझेड क्षेत्रातील योजना व्यवहार्य ठरत नसल्याचे आढळूलन आले आहे. म्हणून सीआरझेड क्षेत्रामधील झोपडपट्टी पुनर्वसन योजना व्यवहार्य ठरण्यासाठी केंद्रीय पर्यावरण विभागाच्या दिनांक ६ जानेवारी, २०११ च्या अधिसुचनेमध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक २४.१.२०१४ रोजी केंद्रीय पर्यावरण विभागास प्रस्ताव सादर केला आहे. यासंदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.२४१५/२०१३ मध्ये दिनांक २४.९.२०१४ रोजी केंद्रीय पर्यावरण विभागास दिनांक ६.१.२०१५ च्या अधिसुचनेसंदर्भात योग्य तो निर्णय दि. ३१.१२.२०१४ पर्यंत द्यावा असे आदेशीत केले आहे. सद्य:स्थितीत सदरचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे विचाराधीन आहे.

राज्यातील महिलांच्या सुरक्षेसाठी न्या. धर्माधिकारी समितीने सुचविलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत

(१६) ५०१ (२४-१२-२०१४). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय औटी (पारनेर), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस) श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महिलांच्या सुरक्षेसाठी न्या. धर्माधिकारी समितीने सुचविलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले, हे खरे आहे काय,
(२) या शिफारशींची अंमलबजावणी झाली नसल्याने मा. न्यायालयाने शासनाविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उक्त समितीने दिलेल्या शिफारशींची अंमलबजावणी तातडीने करण्याकरिता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) :(१) व (२) महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी प्रचलित कायद्यात सुधारणा सुचविण्यासाठी गठीत केलेल्या न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी (सेवानिवृत्त) समितीने शासनास ५ अंतरीम व अंतिम अहवाल शासनास सादर केला आहे. समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे विविध जनहीत याचिका दाखल झाल्या आहेत. मा.न्यायालयाच्या निदेशानुसार शासनाने शपथपत्र दाखल केले असून सद्या सदरची जनहीत याचिका प्रलंबित आहे.

(३) समितीने सादर केलेल्या शिफारशी शासनाच्या विविध विभागाशी संबंधित असल्याने त्यावर त्या विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे. समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीस कक्ष व पोलीस स्टेशनच्या आवारात समुपदेशन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. संकटात सापडलेल्या महिलांच्या माहितीकरिता टोल फ्री हेल्पलाईन क्र. "१०३" मुंबई, ठाणे व नवी मुंबई करिता व उर्वरित जिल्ह्यांकरिता "१०९१" हा हेल्पलाईन क्रमांक सुरु करण्यात आला आहे. तसेच एस.टी.स्टँड व रेल्वे स्टेशनवर मदत केंद्रे सुरु करण्यात आले आहेत. महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे हाताळण्याकरिता २७ विशेष न्यायालये व २२ जलदगती न्यायालये सुरु करण्यात आली आहेत. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विशेष पोलीस अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच राज्यस्तरीय आराखडा तयार करण्यात आला आहे. हुंडा प्रतिबंधक कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी परिविक्षाधिन अधिकारी व घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीसाठी संरक्षण अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात येत आहेत. कामाच्या ठिकाणी महिलांचे होणारे लैगिंक शोषण, छेडछाड व विनयभंगाच्या घटना व स्त्री भ्रूण हत्या रोखण्याकरिता प्रभावी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. पोलीस अधिकारी व कर्मचारी, न्यायाधीश व शासकीय अभियोक्ता यांची महिला व बालकाच्या प्रति संवेदनशिलता वाढविण्याकरिता कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहेत. पिडीत महिलेचा मृत्यूपुर्व जबाब नोंदविण्याबाबत तसेच बलात्कार पिडीत महिलेची वैद्यकीय तपासणी करण्यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. यासोबतच अन्य शिफारशीबाबत विविध विभागामार्फत सकारात्मक कार्यवाही सुरु आहे.

राज्यातील जिल्हा परिषद आणि महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना अल्पोपहार आणि मध्यान्ह भोजन यासाठी सेंट्रल किचन पुरविण्याच्या निर्णयाबाबत

(१७) ५३० (२२-१२-२०१४). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद आणि महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना अल्पोपहार आणि मध्यान्ह भोजन यासाठी सेंट्रल किचन पुरविण्याचा निर्णय शासनाने घेवुनही सेंट्रल किचनची व्यवस्था अद्याप करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई महापालिकेच्या शाळेच्या विद्यार्थ्यांकरिता दिल्या जाणाऱ्या पोषण आहाराकरिता आहार बनविण्यासाठी निविदा मागविण्याचे अधिकार राज्य शासनाकडे आहेत ते अधिकार महापालिकेला देण्याची मागणी महापालिकेने शासनाकडे माहे एप्रिल, २०१४ मध्ये वा त्या सुमारास केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सेंट्रल किचन व्यवस्था पुरविणेबाबत कोणती तातडीची उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१४-०७-२०१५) :(१) न्यायालयीन बाब उदभवल्यामुळे अद्याप केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीद्वारे आहार पुरवठा सुरु करण्यात आलेला नाही.

(२) होय.

(३) मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळता इतर नागरी क्षेत्रासाठी स्वारस्याची अभिव्यक्ती प्रक्रिया राबवून संस्थांची निवड करण्यात आली आहे. यानुषंगाने मा. उच्च न्यायालयामध्ये काही रिट याचिका दाखल झालेल्या होत्या. त्यावर दि.२७/२/२०१४ रोजी मा. उच्च न्यायालयाने शासनाचे बाजूने निर्णय देऊन राज्य शासनाने राबविलेली प्रक्रिया योग्य असल्याचा निर्णय दिलेला आहे. तसेच, आहार तपासणीबाबत स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याचे आणि शिक्षकांना योजनेच्या कामातून वगळण्याचे आदेश दिलेले आहेत. तथापि, सदर केंद्र पुरस्कृत योजनेसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेता मा. उच्च न्यायालयाच्या आदेशामधील "शिक्षकांना योजनेच्या कामातून वगळणे" ही बाब वगळण्यासाठी शासनामार्फत सिव्हील ॲप्लीकेशन दाखल केलेले होते. तथापि, मा. उच्च न्यायालयाने सदर मागणी अमान्य केली होती. यामुळे शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल केलेली होती. सदर याचिकेवर मा. सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाच्या बाजूने निर्णय दिलेला आहे.यामुळे नागरी भागात केंद्रीय स्वंयपाकगृह प्रणाली सुरु करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शाळांमध्ये केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली सुरु करण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील शीळ रस्त्यालगत दोन्ही बाजुला कचरा टाकला जात असल्याने दिवा परिसरातील नागरिकांचे आरोग्यावर परिणाम होत असल्याबाबत

(१८) ६०६ (२३-१२-२०१४). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील शीळ रस्त्यालगत दोन्ही बाजुला ओला व सुका कचरा टाकला जात असल्याने दिवा परिसरातील नागरिकांचे आरोग्य बिघडत असून त्यांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला असल्याचे दिवा, आगासन, दातिवली, आणि खंडी येथील

नागरीकांनी दिनांक २७ ऑक्टोबर, २०१४ रोजी व त्यापूर्वी वांरवार मा.महापौर, उपमहापौर तसेच आयुक्तांकडे मागणी केलेली होती, खरे आहे काय,

(२) उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय, चौकशीत आय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) मधील प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही अद्याप पुर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच परिसरातील नागरिकांच्या आरोग्यांवर गंभीर परिणाम होत असल्याने सदरचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे?

श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१५) :(१) दिवा येथे कचऱ्याची विल्हेवाट लावणे बंद करण्यासाठी स्थानिक नागरिकांकडून वारंवार मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे.

(२) व (३) होय, ठाणे महानगरपालिका प्रशासनाने पाहणी/चौकशी केलेली आहे.

ठाणे महानगरपालिकेचे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प नागरिकांच्या विरोधामुळे कार्यान्वित न झाल्यामुळे कचरा विल्हेवाट करण्यासाठी सदर ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येत आहे. सदर कचऱ्यावर नियमितपणे दुर्गंधीनाशक, जंतुनाशकाची फवारणी करण्यात येत असून आवश्यकतेनुसार मातीचा थर देण्यात येत आहे. त्यामुळे कचरा विल्हेवाटीमुळे नागरीकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याची बाब वस्तुस्थितीला धरुन नाही.

ठाणे येथील वर्तकनगर, शिवाईनगर आणि पोखरण रोड येथील वाहतुकीची कोंडी सोडविण्याबाबत

(१९) ६१० (२३-१२-२०१४). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील वर्तकनगर, शिवाईनगर आणि पोखरण रोड येथील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी कॅडबरी ते शास्त्रीनगर या मार्गावर ८०० मीटरचा उड्डाणपुल उभारण्याची महापालिका स्तरावर सुरु असलेली कार्यवाही अद्यापही पूर्ण झालेली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) मधील प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही अद्याप पुर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच येथील वाहतुकीच्या कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत चाललेली असल्याने सदर उड्डाणपुलाचे काम त्वरेने करण्यांसदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१५) :(१) नाही.

पोखरण रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी सोडविणेकरीता पुलाचे बांधकाम करणेपुर्वी रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक असुन रस्ता रुंदीकरणाचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

(२) व (३) सदर प्रस्ताव विचाराधीन असुन आगामी वर्ष २०१५-१६ मध्ये महापालिकेची पुरेशी आर्थिक तरतुद उपलब्ध झाल्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल.

ठाणे जिल्ह्यातील कुळगांव बदलापूर नगरपालिका शहरात गत दोन वर्षापासून विविध ठिकाणी घरफोड्या व साखळी चोरांनी लाखो रुपयांची चोरी केल्याबाबत

(२०) ६३१ (१५-०१-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कुळगांव बदलापूर नगरपालिका शहरात गेल्या दोन वर्षापासून विविध ठिकाणी घरफोड्या व साखळी चोर यांनी लाखो रुपयांची चोरी केल्याचे पोलीस स्टेशनला तक्रारी देवूनसुध्दा एकाही चोरीचा तपास लागला नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले व त्यानुसार संबंधित दोषी पोलिस अधिकाऱ्यांवर कोणती कडक कारवाई करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :(१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) सन २०१३ व २०१४ मध्ये घरफोडीचे एकूण १३४ गुन्हे दाखल असून ३१ गुन्हे उघडकीस आणलेले आहे. त्यात ५४ आरोपींना अटक करण्यात आली असून , गेला माल १,९०,५७,९४७/- रुपये पैकी ४०,२०,६९४/- रुपये चा माल जप्त करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे सोनसाखळी चोरीचे सन २०१३ व २०१४ मध्ये ६७ गुन्हे दाखल असून, २० गुन्हे उघडकीस आणलेले असून २२ आरोपींताना अटक करण्यात आलेली आहे. गेला माल ३८,३८,७५२/- रुपये पैकी ८,५५,१०२/- रुपये चा माल जप्त करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागाव-पिरवाडी (ता.उरण, जि.रायगड) या गावांची जमिन समुद्राच्या लाटांमुळे खचून पिरवाडी गावांकडे जाणारा रस्ता खचण्याच्या परिस्थितीत असल्याबाबत

(२१) ७०८ (२२-१२-२०१४). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागाव-पिरवाडी (ता.उरण, जि.रायगड) या गावांना समुद्राच्या लाटांमुळे जमिन खचून पिरवाडी गावांकडे जाणारा रस्ता खचण्याच्या परिस्थितीत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच समुद्रांच्या लाटांमुळे जमिनीची धूप ही मोठ्या प्रमाणात होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या ठिकाणी दगडांचा बांध टाकून जमिनीची धूप थांबविण्याकरिता शासनाकडून कोणते प्रयत्न करण्यात आले आहे,
(४) तसेच सदरचा रस्ता दुरुस्त करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) :(१) हे खरे नाही.
(२) समुद्राच्या लाटांमुळे किनाऱ्यालगतच्या भागाची धुप होत आहे.
(३) व (४) नागाव-पिरवाडी येथे धुप प्रतिबंधक बंधारा बांधण्याचे काम हाती घेण्यात आले असून कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

भारत संचार निगम लि.अलिबाग उप विभागीय कार्यालयाने चेंढरे (ता.अलिबाग, जि.रायगड) ग्रामपंचायतीला कराची रक्कम न भरल्याबाबत

(२२) ७६४ (२२-१२-२०१४). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चेंढरे (ता.अलिबाग, जि.रायगड) ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात सन २००० पासून भारत संचार निगमने मोबाईल टॉवरची सेवेसाठी उभारणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामपंचायतीने वारंवार कराची रक्कम भरण्याची मागणी केली असता त्यास प्रतिसाद न देता भारत संचार निगमने सन २०१२ मध्ये न्यायालयात याचिका दाखल केली होती. मा.जिल्हा दिवाणी न्यायालयाने या प्रकरणी हस्तक्षेप न करता भारत संचार निगमची याचिका फेटाळून आलवली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, भारत संचार निगम लि. अलिबागच्या उप विभागीय कार्यालयाने चेंढरे (ता.अलिबाग, जि.रायगड) ग्रामपंचायतीची कराची रक्कम रु २८ लाख ५२ हजार आजतगयत ग्रामपंचायतीकडे भरणा न केल्याने दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१४ रोजी ग्रामपंचायतीने भारत संचार निगम लि.अलिबाग अधिका-यांच्या केबीनला सील ठोकले ही घटना खरी आहे काय,
(४) भारत संचार निगम लि., हा शासनाचा अंगीकृत उपक्रम असल्याने मोबईल टॉवरवर घरपट्टी आकारणी करावी अगर कसे इत्यादी संबंधीचे प्रकरण शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाकडे याबाबतचे प्रकरण किती कालावधीपासून प्रलंबित आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१५) :(१), (२) व (३) होय.
(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी नगर विकास विभागाकडून मागविण्यात आलेल्या अभिप्रायांच्या अनुषंगाने नगर विकास विभागाने स्पष्ट केले आहे की, ग्रामपंचायत हद्दीतील मोबाईल टॉवरवर घरपट्टी आकारणीची कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत

अपेक्षित नाही. ही कार्यवाही महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम च्या कलम १२४, व ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० नुसार करणे आवश्यक आहे.

शासनाच्या दिनांक २१ नोव्हेंबर, २०११ च्या अधिसुचनेद्वारे महाराष्ट्र कर व फी नियम, १९६० मध्ये सुधारणा करण्यात येवुन, पवनचक्कीकरीता आवश्यक मनोरे, तसेच इतर प्रयोजनाकरिता वापरण्यात येणारे मनोरे आणि त्यांची कार्ये पार पाडण्याकरिता आवश्यक असलेल्या खुल्या जागा यावर कर आकारणी करण्याची पध्दत निर्धारीत करण्यात आली असुन, त्यानुसार कर आकारणी करणे राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना बंधनकारक आहे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९४ (१) अन्वये श्री.जयंत पाटील, विधानपरिषद सदस्य यांनी उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचनेसंदर्भात दि. ०१.०४.२०१५ रोजी मा. राज्यमंत्री, ग्रामविकास यांनी "शासनातर्फे तातडीने बैठक घेण्याचे आदेश संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येतील", असे उत्तर दिले आहे.

त्यानुषंगाने तात्काळ उचित कार्यवाही करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांनी दिनांक १३ मे, २०१५ व दिनांक २७ मे, २०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

कर्जत (जि.रायगड) येथील उपजिल्हा रूग्णालयाच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

(२३) ८२६ (२२-१२-२०१४). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) येथील उपजिल्हा रूग्णालयाच्या इमारतीची दुरवस्था झाल्याने तसेच डॉक्टर, परिचारिका यांची पदे रिक्त असल्याने तसेच रूग्णालयातील उपकरणे नादुरूस्त असल्याने रूग्णाना पूर्ण क्षमतेने औषधोपचार मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनामार्फत रूग्णालयाची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार रूग्णालयाचा कारभार सुरळीत चालावा व रूग्णांना पूर्ण क्षमतेने औषधोपचार मिळावा म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (१६-०६-२०१५) :(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहरात विविध प्रकारचे गुन्हे मोठ्या प्रमाणात वाढत असल्याबाबत

(२४) ९६७ (१५-०१-२०१५). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात विविध प्रकारचे गुन्हे मोठ्या प्रमाणात वाढत असून त्यात दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढ होतच असल्याचा प्रकार घडत असल्यामुळे नागरीकांमध्ये चिंतेचे व भितीचे वातावरण पसरत असल्याचे माहे सप्टेंबर २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढत्या गुन्ह्यांना आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) :(१) मुंबई लोकसंख्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. मुंबई येणा-या विविध प्रकारच्या लोकांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोकही सामिल असतात, सबब मुंबईत गुन्हेगारीची प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत आहे.

(२) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील पोलीस ठाणे, स्तरावर जास्तीत जास्त मुनष्यबळ गणवेषात, रस्त्यांवर पोलीसांची उपस्थिती जाणवेल अशा रितीने बंदोबस्त व गस्त ठेवण्यात येते. ज्या ठिकाणी गुन्ह्यांचे प्रमाण जास्त असेल अशा ठिकाणी साध्या वेषातील तसेच गणवेषातील पोलीसांची निगराणी ठेवण्यात येते.

मुंबई शहरातील वाढत्या गुन्हेयांचे प्रमाण पाहाता खंडणी विरोधी पथक, जबरी चोरी, दरोडा विरोधी पथक, मोटार वाहन चोरी विरोधी पाथक, चैन स्नॅचिंग विरोधी पथक, महिला अत्याचार विरोधी कक्ष, गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक, मालमत्ता कक्ष व परिमंडळनिहाय १ ते १२ गुन्हे प्रकटीकरण कक्ष स्थापन करण्यात आलेले आहेत.

गुन्हेगारांची माहिती व नागरिकांमध्ये पोलीसांविषयी सलोख्याची भावना निर्माण होण्यासाठी पोलीस ठाणे स्तरावर मोहल्ला कमिटी, शांतता कमिटी स्थापन करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक शहरातील मातंग समाजाच्या महिलांना सामाजिक न्याय विभागातील वसतीगृहे व कार्यालयातील साफसफाई, माळीकाम इत्यादी कामे निविदा न मागवता प्रायोगिक तत्वावर देण्याबाबत

(२५) १०५५ (२२-१२-२०१४). श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील विविध स्मशानभुमीमध्ये राख चाळण्याचे काम करणाऱ्या समाजाच्या महिलांना सामाजिक न्याय विभागातील वसतीगृहे व कार्यालयातील साफसफाई, माळीकाम इत्यादी कामे निविदा न मागवता प्रायोगिक तत्वावर देण्याबाबत दिनांक ३१ जानेवारी, २०१४ रोजी शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. राजकुमार बडोले (१४-०७-२०१५) :(१) नाही.

तथापि तत्कालिन मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम, पर्यटन) यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३०/१/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत नाशिक येथील प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, सहायक आयुक्त, समाजकल्याण, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (कार्यालये व वसतीगृहे) तसेच नाशिक महानगरपालिकेची कार्यालये यामधील साफसफाई, माळीकाम, सुरक्षा रक्षक इत्यादी कामे टेंडर न मागविता मातंग समाजातील अशा महिलांना प्रायोगिक तत्वावर देण्यात यावीत असे तत्कालीन मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम, पर्यटन) महोद्यांनी निर्देश दिलेले आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

सन २००९ पासून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील मागासवर्गीय व अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती न मिळाल्याबाबत

(२६) १०५७ (२२-१२-२०१४). श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील मागासवर्गीय व अल्पसंख्यांक विद्यार्थी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती सन २००९ पासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच या विद्यापीठातून दुरस्थ शिक्षण घेणा-या मागासवर्गीय व अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळून देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, वा चौकशीत काय आढळून आले,
(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे ?

श्री. राजकुमार बडोले (०९-०६-२०१५) :(१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर येथील क्रिडा संकुलाचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत

(२७) १०७९ (२२-१२-२०१४). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) : सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर क्रिडा संकूलाच्या विस्तारासाठी ७ कोटींचा आराखडा तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा नियोजन समिती, कोल्हापूर यांनी क्रिडा संकुलातील रनिंग ट्रॅकसाठी रुपये २ कोटी देण्याचे तत्वतः मान्य करूनही सदर रनिंग ट्रॅकला, मुख्य अभियंता यांचेकडून तांत्रिक मान्यता घेण्यास जिल्हा परिषदेतील अधिका-यांनी दुर्लक्ष केले आहे, तसेच सदर संकुलाचे काम माहे फेब्रुवारी, २०१४ पासून थांबविण्यात आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, रनिंग ट्रॅकसह क्रिडा संकूलाचे बांधकाम तात्काळ पुर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली किंवा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०७-२०१५) :(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) कोल्हापूर जिल्ह्याच्या जिल्हा वार्षिक योजना, सन २०१४-१५ अंतर्गत नाविन्यपूर्ण योजना म्हणून मौ.शिंगणापूर, ता.करवीर, जि.कोल्हापूर येथे जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी स्वत:च्या निधीतून सुरु केलेल्या निवासी क्रीडा प्रशालेच्या प्रशासकिय इमारत, बहुउद्देशिय हॉल व क्रीडांगण बांधकाम यासाठी रु. ५.३५ कोटीचा जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचा प्रस्ताव आवश्यक कागदपत्रे व तांत्रिक मंजूरी अभावी जिल्हा नियोजन समितीकडून जिल्हा परिषद यांना परत करण्यात आला. जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडून अद्याप सुधारीत प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीस सादर करण्यात आलेला नाही.

राज्यातील मागासवर्गीयांना जातीचे दाखले व जातीचे वैधता प्रमाणपत्र मिळण्याबाबत

(२८) ११२३ (२२-१२-२०१४). श्री.रवि राणा (बडनेरा) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोळी, महादेव कोळी, धनगर, गोवाटी, हळवा, हलबी, माना, ठाकूर, मन्नोवार, कोष्टी, राजपूत, भोई, बेलदार, धोबी, बहुरूपी इत्यादी ३३ समाजाचे पदाधिकारी, कार्यकर्ते नेतेमंडळीनी त्यांना शासनाकडून जातीचे सवलती व त्यांचे मागणीप्रमाणे जातीचे दाखले व जातीचे वैधता प्रमाणपत्र मिळावे याकरिता शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मोर्चा, रस्ता रोका, रेल रोको, धरणे आंदोलन सुरु आहे या दरम्यान उपोषणाला बसणा-या कार्यकर्त्यांची प्रकृती खालावून गंभीर होऊन उपचारासाठी हॉस्पीटल मध्ये दाखल केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन काय भुमिका घेणार आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय ?

श्री. राजकुमार बडोले (१४-०६-२०१५) :(१) हे खरे नाही,
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

बडनेरा शहर (जि.अमरावती) येथील नवीन टाकी बांधकाम प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत

(२९) ११३६ (१५-०१-२०१५). श्री.रवि राणा (बडनेरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बडनेरा शहर (ता.जि.अमरावती) येथील वाढीव पाणीपुरवठयासाठी नवीन टाकी बांधकामाचे प्रस्तावास शासनाने मान्यता दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामास किती निधी मंजूर केला आहे, व कामाची सद्यस्थिती काय आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) :(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

हडपसर मतदार संघातील पुणे सोलापूर व पुणे मिरज रेल्वे लाईनवर घोरपडी येथे उड्डाण पुल बांधणेबाबत

(३०) ११६६ (२३-१२-२०१४). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर मतदार संघातील पुणे सोलापूर व पुणे मिरज रेल्वे लाईनवर घोरपडी येथे उड्डाण पुल बांधणेसाठी मागणी नागरिकांकडून गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी उड्डाण पुल व्हावा म्हणून नागरिकांनी अनेक वेळा आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेने या उड्डाणपुलासाठी प्रस्ताव तयार करुनही अजून पर्यंत हे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने यावर काय उपाय योजना केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) :(१) होय.

(२) सदर उड्डाण पूलाबाबत स्थानिक नागरिक, संस्था व लोक प्रतिनिधी यांनी महानगरपालिकेकडे पत्रव्यवहार केलेला आहे.

(३), (४) व (५) सदर उड्डाणपुलाचा भाग हा पुणे कॅन्टोमेंट हद्दीत असून सदर उड्डाणपुलासाठी पुणे महानगरपालिकेने तज्ञ सल्लागाराची नेमणूक केलेली आहे. या उड्डाणपुलाकरीता पुणे

कॅन्टोन्मेंट संरक्षण विभाग, रेल्वे व महसूल विभागाच्या जागांची आवश्यकता आहे. या सर्व विभागाशी पुणे महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी चर्चा करुन पत्रव्यवहार करण्यात येत आहे. संरक्षण विभागाने त्यांच्या आस्थापनांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सदर उड्डाणपुलाच्या कामास असमर्थता दर्शविलेली आहे. संरक्षण विभागाकडून जागा उपलब्ध होणेकरीता सचिव, संरक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांचेशीदेखील पत्रव्यवहार करणेत आलेला आहे. या उड्डाणपुलाचे रेल्वे विभागातील नकाशास रेल्वे विभागाकडून मंजूरी मिळाली असून तपासणी फी रुपये ९,७६,१७५/- अदा करण्यात आलेले आहे.

पुणे शहरातील कमला नेहरु रुग्णालयातील अनेक मशिन्स बंद असल्याबाबत

(३१) ११७१ (२३-१२-२०१४). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील कमला नेहरु रुग्णालयातील ईसीजी, सोनोग्राफी, लॅप्रोस्कोप आदी सुमारे ३० मशीन अनेक महिन्यांपासून बंद असल्याची माहिती माहे नोव्हेंबर, २०१४ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विभागाच्या या कारभाराची चौकशी करावी, अशी मागणी पुणे शहरातील नागरिकांनी महापालिका आयुक्त यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू प्रकरणी चौकशी पुर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदरहू तपासणी यंत्रणा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) :(१) कमला नेहरु रुग्णालय येथे एकूण २७ मशिन्स नादुरुस्त होत्या. त्यापैकी ईसीजीच्या ६ मशिन्स कार्यान्वित करण्यत आल्या आहेत. तसेच दोन सोनोग्राफी मशिन्सपैकी एक कार्यान्वित असून उर्वरित दुसरी मशिन सहा वर्ष जुनी झाल्यामुळे व दुरुस्त होवू शकत नसल्यामुळे (जुनी टेक्नॉलॉजी) निरस्त करण्याची प्रक्रिया चालू आहे. तसेच कमला नेहरु रुग्णालय येथे पाच लॅप्रोस्कोप असून त्यापैकी चार लॅप्रोस्कोप कार्यान्वित असून उर्वरित एक लॅप्रोस्कोप नादुरुस्त असल्याने ठेकेदारांमार्फत दुरुस्त करुन घेण्याची प्रक्रिया चालू आहे. अशा प्रकारे २७ मशिन्सपैकी १७ मशिन्स दुरुस्त झालेल्या असून उर्वरित १० मशिन्सपैकी ६ मशिन्स दुरुस्तीची प्रक्रिया चालू असून उर्वरित ४ मशिन्स पाच ते सहा वर्ष जुन्या असल्याने निरस्त करण्याची प्रक्रिया चालू आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

येरमाळा (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथे ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याबाबत

(३२) १२६२ (१५-०१-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरमाळा (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथे ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) तसेच प्रत्यक्षात किती कालावधीत ट्रॉमा केअर सेंटरची उभारणी करण्यात येणार आहे?

डॉ. दीपक सावंत (३०-०६-२०१५) :(१) हे खरे नाही.

दि.१७.०१.२०१३ च्या शासन निर्णयान्वये मान्य बृहत आराखड्यात निकषानुसार वाशी, जि.उस्मानाबाद येथे ट्रामा केअर सेंटर स्थापनेस मान्यता देण्यात आली असून येरमाळा, जि.उस्मानाबाद येथे ट्रामा केअर सेंटर उभारण्याची बाब सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रमेश मणचेकर यांच्या हत्येच्या तपासाबाबत

(३३) १३२० (२३-१२-२०१४). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रमेश मणचेकर यांची हत्या होऊन वर्ष उलटले तरी आरोपीचा अद्यापही तपास लागला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या हत्येकरीता वापरलेली हत्यारे सापडली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची पोलीस तपासाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) :(१) व (२) होय.

(३) सदर प्रकरणी अज्ञात आरोपींविरुध्द कणकवली पोलीस स्टेशन गुरक्र.८७/१३ भादंवि कलम ३०२ प्रमाणे दिनांक ०२.०९.२०१३ रोज दाखल करण्यात आलेला असून सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पाचोरा (जि. जळगांव) शहारात स्मशानभूमी ते राज्यमार्ग १९ या रस्त्यावर हिवरा नदीवर पूल बांधण्याबाबत

(३४) १३४९ (२२-१२-२०१४). श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा (जि. जळगांव) शहारात रहदारी वाढलेली असल्यामुळे स्मशानभूमी ते राज्यमार्ग १९ या रस्त्यावर हिवरा नदीवर पूल बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाबाबत केव्हा निर्णय घेण्यात येणार आहे,

(३) निर्णय घेतला असल्यास, त्यांचे स्वरुप काय आहे, त्यांची अंमलबजावणी केव्हापर्यंत करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०७-२०१५) :(१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर महानगरपालिकेतर्फे धरमपेठ झोन मधील प्रात्यक्षिक क्षेत्रात पाणी पुरवठा योजनेच्या आंतरिक जलवाहीन्याच्या गळतीमुळे पाणी वाया गेल्याबाबत

(३५) १३८३ (२३-१२-२०१४). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेतर्फे धरमपेठ झोन मधील प्रात्यक्षीक क्षेत्रात २४x७ पाणी पुरवठा योजना आल्यानंतर उपभोक्तांचे उपभोक्तांचे आंतरीक जलवाहीन्या मधुन गळतीमुळे वाया गेलेले पाण्यामुळे प्रती महिना ५० युनीट पेक्षा अधिक नोंद झालेली पाणीपट्टीची रक्कम निर्लेखित करणे बाबत चा प्रस्ताव शासनास दिनांक २० ऑगस्ट, २०११ ला पाठविण्यात आल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासना तर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली,

(३) नसल्यास, यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास करावा लागत असून यावर शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०६-२०१५) :(१) होय.

(२), (३), (४) याबाबत महानगरपालिकेस दिनांक २३ मार्च २०१५ च्या शासन पत्रान्वये अधिनियमातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहेत.

ठाणे येथील कळवा परिसरात असलेल्या खारलँडच्या जमिनीवर शासकीय / निमशासकीय उपक्रमांकरीता जमिनीचे वाटप करण्याबाबतचा घेतलेला निर्णय

(३६) १४६६ (२४-१२-२०१४). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील कळवा परिसरात असलेल्या खारलँडच्या जमिनीवर शासकीय / निमशासकीय तसेच लोकोपयोगी उपक्रमांकरीता शासनाने माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये जमिनीचे वाटप करण्याचा निर्णय घेतलेला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिमिनीबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्या प्रकरणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रितनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दुस-या आठवड्यात मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास या प्रकरणी शासनाने घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसा आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. एकनाथराव खडसे (३०-०६-२०१५) :(१) मौजे कळवा, ता.जि.ठाणे येथील खारभूमी विभागाची जमीन विविध शासकीय /निमशासकीय प्रयोजनासाठी त्या त्या विभागांना दिनांक २९/०३/२०१२ च्या ज्ञापनाव्दारे मंजूर करण्यात आली आहे.

(२) व (३) मौजे कळवा, ता.जि.ठाणे येथील विविध विभागांना प्रशासकीय प्रकल्प राबविण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या विषयाधीन जमिनीवरील प्रकल्प मार्गी लावण्यासाठी बैठक आयोजित करून आदेश देण्याची विनंती माहे जानेवारी, २०१५ मध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली होती. त्यानुषंगाने दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली हाेती. सदर बैठकीत डॉ.बाबासाहेब आंबडेकर सामाजिक न्याय भवन या प्रयोजनासाठी दिलेली जमीन वगळता उर्वरित शासकीय जमीन सुनियोजित पध्दतीने विकसित करण्याकरीता विभागीय आयुक्त, कोकण यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या मदतीने ''Central Business District'' चा बहुत आराखडा तयार करुन घेण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली आहे.

शासनाने सुधारित मान्यता दिलेल्या नर्सिंग अभ्यासक्रमाच्या मागासवर्गीय व अल्पसंख्याक विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती मिळण्याबाबत

(३७) १५१२ (२२-१२-२०१४). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०११ नंतर शासनाने नव्याने मान्यता दिलेल्या नर्सिंग अभ्यासक्रमाच्या मागासवर्गीय व अल्पसंख्याक विद्यार्थीनींची शिष्यवृत्ती शासनाने दिलेली नाही हे खरे आहे का,

(२) असल्यास हजारो अल्पसंख्याक व मागसवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती मंजुर करणेबाबत शासन कार्यवाही करणार आहे काय,
(४) नसल्यास, सदर खाजगी शिक्षण संस्थांना भरपाईपोटी अनुदान देणार आहे काय ?

श्री. राजकुमार बडोले (०९-०६-२०१५) : (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ए.एन.एम. व जी.एन.एम. या अभ्यासक्रमांच्या शिष्यवृत्ती देण्याबाबतच्या सूचना शासन निर्णय दिनांक २१/०४/२०१२ नुसार देण्यात आल्या आहेत.

मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार वैद्यकीय शिक्षण विभागाने शासन निर्णय २७/०३/२०१४ अन्वये सदर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी आवश्यकता प्रमाणपत्राबाबतच्या अटीत सुधारणा केली आहे. त्यानुषंगाने सामाजिक न्याय विभागाने दिनांक ७/५/२०१४ व दिनांक १०/७/२०१४ च्या पत्रान्वये ए.एन.एम. व जी.एन.एम. अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना सन २०१३-१४ पासून शिष्यवृत्ती मंजूर करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत.

राजापेठ अमरावती येथील उड्डाण पुलाचे बांधकामाबाबत

(३८) १५६३ (२३-१२-२०१४). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापेठ अमरावती येथील उड्डाण पुलाचे बांधकामाकरिता दिनांक ३० मार्च, २०१४ चे शासन निर्णयान्वये २ कोटी रुपयांचे व प्राथमिक सोई सुविधा विशेष अनुदांना अंतर्गत ८ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पाच्या निविदा मंजूर होऊन प्रत्यक्ष बांधकामात सुरुवात करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पाचे बांधकाम केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारण काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१५) :(१) होय.
(२) सदर कामाबाबत निविदा प्रक्रिया सुरु आहे.
(३) सदर कामाचे पार्ट-ए व पार्ट-बी सह रु.३२.६३ कोटी ची ई-निविदा दि.२८/५/२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून स्पर्धे अंती नियुक्त एजन्सी मार्फत सदर काम निर्धारीत वेळेत पुर्ण करण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न राहील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पिंपरी-चिंचवड एमआयडीसी भागातील काही कारखान्यातुन दुषित पाणी नदीत सोडले जात असल्याबाबत

(३९) १५६९ (२२-१२-२०१४). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड एमआयडीसी भागातील काही कारखान्यातून सांडपाण्याचे व रासायनीक मिश्रीत पाण्याचे शुध्दीकरण न करता नदी पात्रात सोडले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुषित पाणी नदीपात्रात सोडत असलेल्या संबंधित कंपन्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत वा कारवाईची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. रामदास कदम (३०-०६-२०१५) :(१) हे खरे नाही.

उद्योगातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन प्रक्रियाकृत सांडपाणी उद्योगाच्या आवारामध्ये बागबगिच्यासाठी व काही उद्योगामध्ये पुनर्वापरासाठी वापरले जाते. एका उद्योगास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कडक मानांकन देऊन प्रक्रियाकृत सांडपाण्याचा जास्तीत जास्त पुनर्वापर करुन उर्वरित प्रक्रियाकृत सांडपाणी नदीत सोडण्यासाठी सशर्त संमतीपत्र प्रदान करण्यांत आले आहे.

(२) आणि (३) पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्रातून प्रामुख्याने वाहणाऱ्या पवना नदीच्या पाण्याची गुणवत्ता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्रत्येक महिन्यास रावेत बंधारा ते दापोडी या दरम्यान सहा ठिकाणी तपासली जाते. तपासणी अहवालावरुन नदीमध्ये रासायनिक स्वरुपाचे प्रदूषण झालेचे दिसुन आले नाही. तथापि, महानगरपालिका हद्दीतून निर्गमित हाेणाऱ्या घरगुती सांडपाण्यामुळे नदीचे पाणी प्रदूषित होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची सध्याची एकूण सांडपाणी प्रक्रिया क्षमता २८२ एम.एल. डी. इतकी असून सद्यस्थितीत सुमारे २२४ एम.एल.डी. प्रक्रियाकृत नागरी सांडपाणी पवना,मुळा व इंद्रायणी नदीमध्ये वेगवेगळया ठिकाणी सोडण्यात येते. उर्वरित सांडपाणी (६७ एम.एल.डी) संपूर्ण शहरामध्ये भुयारी गटार योजना नसल्यामुळे विनाप्रक्रिया पवना (रावेत बंधाराच्या खालील बाजूस), मुळा व इंद्रायणी नदीमध्ये वेगवेगळया ठिकाणी नाल्यामार्फत मिसळते.

भिमा नदी व तिच्या उपनद्यांचे (जसे पवना व इतर) प्रदूषण रोखणेकामी शासन स्तरावर तसेच जिल्हाधिकारी,पुणे यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यांत आली आहे. समितीच्या निर्देशानुसार तयार करण्यात आलेला प्रदूषणविषयक सर्वेक्षण अहवालामध्ये नदीचे प्रदूषण रोखणेकामी तातडीच्या व दिर्घकालीन उपाययोजनाचा समावेश असून सदर अहवाल केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे.

कर्जत ता.जि.रायगड येथील कळंब या मार्गाचा वापर बहुतांशी चोरट्या तस्करीकरिता केला जात असल्याबाबत

(४०) १८११ (०४-०१-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (ता.जि.रायगड) येथील कळंब या मार्गाने ठाणे जिल्ह्यात प्रवेश करताना मार्गाचा वापर बहुतांशी चोरट्या तस्करीकरिता केला जात असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

माटूंगा, मुंबई येथील लेबर कॅम्पजवळील शाहू नगर येथील पाण्याची टाकी मोडकळीस आल्याबाबत

(४१) १८२९ (२३-१२-२०१४). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माटुंगा, मुंबई येथील लेबर कॅम्पजवळील शाहू नगर येथील पाण्याची टाकी मोडकळीस आल्याने जवळच राहणा-या झोपडपट्टीतील नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लेबर कॅम्प आणि शाहू नगर परिसराला पाणीपुरवठा करण्यासाठी पालिका प्रशासनाने काही वर्षापूर्वी शाहू नगर परिसरात पाण्याची भव्य टाकी उभारली होती परंतू मागील अनेक वर्षापासून डागडुजी झाली नसल्याने ती मोडकळीस आली आहे हे पाहता शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :(१) व (२) माटुंगा मुंबई येथील लेबर कॅम्प जवळील शाहू नगर येथील पाण्याची टाकी मोडकळीस आली होती. सदर पाण्याची टाकी महापालिका प्रशासनाने सुमारे ४० वर्षापूर्वी बांधली होती. सदर पाण्याची टाकी मोडकळीस आल्याने सन २००४ मध्ये सदर टाकीच्या पुनर्बांधणीचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आले होते. तथापि पाण्याच्या टाकीत पाणी चढविण्याकरिता कार्यरत असलेले पंप शाहू नगर परिसरात नव्याने बांधलेल्या पंपरुमकडे स्थलांतरीत करतांना परिसरातील इमारतींच्या पाणी पुरवठ्यावर मोठ्या प्रमाणात व्यत्य निर्माण होणार असल्याने सन २००६ मध्ये महापालिका प्रशासनाने सदर काम बंद केले.

तद्नंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियोजन व संकल्पचित्रे खात्याकडून निविदा प्रक्रिया राबविली गेल्यानंतर फेब्रुवारी, २०१४ मध्ये मोडकळीस आलेली पाण्याची टाकी पाडणे व पुनर्बांधणीच्या कामाकरिता कार्यादेश देण्यात आले असून पाणी पुरवठ्याची पर्यायी व्यवस्था उपलब्ध करुन ऑक्टोबर २०१४ मध्ये पाण्याची टाकी पाडण्याच्या कामास सुरुवात झालेली आहे व सदर काम प्राधान्याने पूर्ण करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

भायखळा, मुंबई येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालयाबाबत

(४२) १८३० (२३-१२-२०१४). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.आशिष शेलार (वांदे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालयात काही प्राण्यांच्या बहुतांशी पिजंऱ्याची दुरवस्था झाली असून मगरीचा पाण्याचा हौद स्वच्छ नाही, अस्वलाच्या हौदात आवश्यक पाणी नसणे व अस्वच्छता असणे, दोन पाणगेंडे असून त्यांच्या शरीरावर जखमा झाल्या आहे त्यांना आवश्यक पाणी नसणे, हरिणींची संख्या अधिक असून त्यांना केअरटेकर नसणे इत्यादी गैरसोयी उद्यानात असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्राणिसंग्रहालयात प्राण्याची निगा नीट राखली जात नसून तेथील कर्मचारी प्रशिक्षीत नसल्याने तसेच येथे वाहनांना प्रवेश देऊ नये असे अपेक्षित असताना तेथे दुचाकी वाहनांसह महानगरपालिकेची वाहनेच वारंवार घुटमळत असल्याने प्राणिसंग्रहालयात प्रदुषणाची भर पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच नव्याने तेथे हम्बोट पेग्विंन पक्षी दाखल करण्यात येणार आहेत तेव्हा ते सर्व पाहता या नवीन पाहुण्यांची व पूर्वीच्या पशु-पक्षांची देखरेख व्यवस्थित होण्याकरीता शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. सदर उद्यान व प्राणिसंग्रहालयाच्या आतमध्ये वाहनांचा वापर करण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत.

(३) या ठिकाणी आणण्यात येणाऱ्या पेंग्वीन पक्ष्यांकरिता उत्तमरित्या विकसित करण्यात आलेल्या सुविधांबाबतचा अभ्यास करण्यासाठी या प्राणिसंग्रहायातील पशुवैदयांना सिंगापूर झुऑलॉजिकल पार्क, सिंगापूर व खावख्याव ओपन झू, बँकॉक येथे पाठविण्याचे प्रस्तावित आहे. तसेच सदर पक्ष्यांचा देखभालीसाठी पुढील पाच वर्षांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर संबंधित क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या संस्थेची नियुक्ती कंत्राटी पध्दतीने करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्ह्यातील २७ पोलीस स्थानकात हायटेक मशिनरी योग्य मार्गदर्शकाअभावी पडून असल्याबाबत

(४३) १८३५ (१५-०१-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गुन्ह्यांचे शोध झटपट लागावे आणि गुन्हेगारांची यादी तातडीने उपलब्ध व्हावी या सर्वदृष्टीने महत्वकांक्षी ठरणाऱ्या हायटेक क्राईम ॲण्ड क्रिमिनल ट्रेकिंग नेटवर्किंग सिस्टीमसाठी रायगड जिल्ह्यातील २७ पोलीस स्थानकात हायटेक मशिनरी असल्या तरी त्या योग्य मार्गदर्शकाअभावी पडून असल्याने सदरहू सिस्टीम सुरु होण्यास विलंब लागत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने त्वरीत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०७-२०१५) :(१) व (२) हे खरे नाही. क्राईम ॲण्ड क्रिमीनल ट्रेकिंग नेटवर्कीग सिस्टिम भारत सरकार, नवी दिल्ली (गृह विभाग) यांचा महत्वाकांक्षी प्रकल्प असून सदर प्रकल्प उभारणीचे काम रायगड जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात जवळपास ९८% पुर्ण झालेले आहे. राज्यातील सर्व पोलीस घटकांतुन सराव चाचणी सुरू केली असून त्याअंतर्गत ठाणे दैनंदिनी, गुन्हे नोंदणी इत्यादी सर्व प्रकारचे अभिलेख स्टेट डेटा सेंटर, मुंबई येथे नेटवर्कद्वारा अद्ययावत करण्याचे काम सुरु आहे. तसेच राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र राज्य सी.सी.टी.एन.एस. प्रकल्प अंमलबजावणीमध्ये आघाडीवर आहे. त्यानंतर सी.सी.टी.एन.एस. प्रकल्प हा सर्व पोलीस ठाणी व वरिष्ठ कार्यालयांमध्ये कार्यान्वीत करण्याचे प्रस्तावीत आहे. सन १९९८ पासूनची गुन्हे व गुन्हेगारांची माहिती संगणकीकृत करुन स्टेट डेटा सेंटर, मुंबई येथे उपलब्ध करण्यात आली आहे. सदर प्रकल्प हाताळणीचे प्रशिक्षण सर्व पोलीस घटकांमध्ये जिल्हा पोलीस संगणक प्रशिक्षण केंद्रामार्फत पोलीस अधिकारी व अंमलदारांना देण्यात येत असून आतापर्यंत ६० % पेक्षा अधिक प्रशिक्षण पुर्ण केले असून प्रशिक्षणाची प्रक्रिया चालु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील माहिम भागातील भागोजी कीर मार्गावरील साईराम अपार्टमेंट जवळ करण्यात आलेली वृक्षतोड

(४४) १८७९ (२३-१२-२०१४). श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माहिम भागातील भागोजी कीर मार्गावरील साईराम अपार्टमेंट शेजारील एक झाड तोडण्यासाठी परवानगी असतांना अधिका-यांना हाताशी धरुन विकासकाने ७ ते ८ झाडांची तोड केली असल्याचे दिनांक १६ सप्टेंबर, २०१४ रोजी च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाची तक्रार माहिममधील नागरीकांनी माहीम पोलीस ठाण्यात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे,
(४) याप्रकरणी अद्याप चौकशी पूर्ण झाली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :(१) हे खरे नाही.तथापि या संदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/उत्तर विभागात तक्रार प्राप्त झाली होती.
(२) होय, हे खरे आहे. एका स्थानिक राहिवाशाने या संदर्भात माहिम पोलीस ठाणे येथे तक्रार केली होती.
(३) व (४) सदर ठिकाणी इमारत बांधकामाच्या आड येणारी एकूण ८ झाडे कापण्यासाठी व ३ झाडे पुनर्रोपित करण्यासाठी वृक्ष प्राधिकरणाच्या मान्यतेने परवानगी देण्यात आली होती. परंतु सदर ठिकाणाची स्थळ पाहणी केली असता, जतन करावयाच्या एकूण १५ झाडांपैकी ८ झाडे आढळुन आली नाहीत. म्हणून विकासक मेसर्स ललित डेव्हलपर्स यांच्याविरुध्द माहिम पोलीस ठाणे येथे दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राज्यातील धर्मदाय, शैक्षणिक तसेच सामाजिक क्षेत्रातील ९९० संस्थानी परदेशी देणग्या घेवुन मोठ्या प्रमाणात आर्थिक अपहार केल्याबाबत

(४५) २०१५ (२३-१२-२०१४). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील धर्मदाय, शैक्षणिक तसेच सामाजिक क्षेत्रातील ९९० संस्थानी परदेशी देणग्या घेवुन त्याचा हिशोब सादर न केल्याने दिनांक ९ नोव्हेबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक अपहार झाला असल्याची शक्यता लक्षात घेता राज्य शासनाने संबंधित कोणत्या संस्थेवर काय कारवाई केली,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

नरेंद्र दाभोळकर यांची हत्या करणाऱ्या आरोपींना अटक करण्याबाबत

(४६) २०२४ (१५-०१-२०१५). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंधश्रद्धा निर्मूलनासाठी अखंड लढा देणाऱ्या नरेंद्र दाभोळकर यांची दिनांक २० ऑगस्ट २०१३ रोजी हत्या करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हत्त्या करणाऱ्यां आरोपींना अटक करण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) :(१) होय.
(२) सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल पीआयएल ४४/१३ (नवीन क्र.७/२०१४) मध्ये दिनांक ०५.०९.२०१३ रोजी मा.न्यायलायाने सदर गुन्ह्याचा तपास सीबीआयकडे हस्तांतरीत करण्याबाबत दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने सदर गुन्ह्याचा तपास सीबीआयमार्फत करण्यात येत आहे. सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

जळगांव जिल्ह्यात प्रामुख्याने जळगांव शहर, भुसावळ मध्ये शुध्द पिण्याचे पाणी विक्री करणाऱ्या अवैध कंपनी सुरु असल्यामुळे जनतेच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याबाबत

(४७) २०४९ (१५-०१-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यात प्रामुख्याने जळगांव शहर, भुसावळ मध्ये शुध्द पिण्याचे पाणी विक्री करणारे अवैध कंपनी सुरु असल्यामुळे जनतेच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याची बाब दिनांक १२ मे, २०१४ रोजीच्या सुमारास विविध तक्रार अन्न, औषध प्रशासनाकडे करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रार व बाबीनुसार प्रशासनाद्वारे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, चौकशीमध्ये दिरंगाई होत असल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (१७-०६-२०१५) :(१) अन्न व औषध प्रशासनाच्या जळगाव कार्यालयास दिनांक १२ मे २०१४ रोजी विना परवाना थंड पाण्याचे उत्पादन व विक्री होत असल्याची प्राप्त झाली होती.
(२) व (३) दिनांक २२ मे २०१४ रोजी संबधित कार्यक्षेत्राचे अन्न सुरक्षा अधिकारी यांनी मे.ॲक्वा केअर प्लस, रावेर या पेढीची तपासणी केली असता, सदर ठिकाणी विना बी.आय.एस. व विना परवाना पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरचे उत्पादन होत असल्याने सदर ठिकाणी २० लिटरचे १२ जार किंमत रु. ६२०४/- चा साठा जप्त करण्यात आला. सदर प्रकरणी पेढीस अन्न सुरक्षा मानके कायद्यांतर्गत व्यवसाय बंद करण्याचे आदेश त्वरीत देण्यात आले आहेत. सदर प्रकरणातील आरोपी विरूध्द अन्न सुरक्षा मानके कायद्यांतर्गत मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रावेर यांचे न्यायलयात खटला दाखल करण्यात आला असून तो न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे याप्रकरणी दिरंगाई झालेली नाही.

सिध्दीनाथ वडगांव (जि.औरंगाबाद) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याबाबत

(४८) २०९२ (२२-१२-२०१४). श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिध्दीनाथ वडगांव (जि.औरंगाबाद) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात २० ते ५५ गावे येऊन ५० ते ५५ हजार जनतेच्या आरोग्यासठी एकमेव केंद्र आहे तरीही पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे रुग्णसेवा मिळत नसल्याने ग्रामस्थांनी केंद्राला कुलूप ठोकूनही शासनाने याकडे लक्ष दिले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुरेसा कर्मचारी वर्ग पुरविण्याबाबत व परिसरातील रुग्णांना आरोग्य सेवा मिळण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (३०-०६-२०१५) :(१) होय, दिनांक १०/११/२०१४ रोजी गावकऱ्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र सिध्दनाथ वडगांवला कुलूप ठोकले होते, हे खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र सिध्दीनाथ वडगांवची लोकसंख्या ५२०३६ असून सदर प्राथमिक आरोग्य केंद्रातर्गत ४५ गावे अंतर्भुत आहेत. दिनांक १०/११/२०१४ रोजी अनधिकृत गैरहजर राहिल्यामुळे प्रयोगशाळा तंत्रज्ञ व संबंधित आरोग्य सेविका यांची एक दिवसाची अनधिकृत गैरहजेरी विनावेतन करण्यत आलेली आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र सिध्दनाथ वडगाव येथे आरोग्य सेविका मुख्यालयात कायम स्वरुपी राहत नसल्यामुळे त्यांचा घरभाडे भत्ता बंद करण्यात आलेला आहे.

(२) व (३) प्राथमिक आरोग्य केंद्र सिध्दीनाथ वडगांव येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांचे पद रिक्त असून सदर रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार तालुका आरोग्य अधिकारी यांचेकडे देण्यात आलेला आहे.

मुलींना पदवीपर्यंत शिक्षण मोफत देण्याचा शासनाच्या निर्णयाबाबत

(४९) २०९५ (२२-१२-२०१४). श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुलींना पदवीपर्यंत शिक्षण मोफत देण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(२) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे, सदरहू निर्णय प्रत्यक्ष होण्यासाठी किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१६-०७-२०१५) :(१) होय,
(२) व (३) सदर धोरणात्मक बाब शासनाच्या विचारधीन आहे.

राज्यातील औद्योगिक क्षेत्रामध्ये झिरो लिक्वीड डिस्चार्ज सिस्टीम वापर करणेबाबत

(५०) २१२२ (२२-१२-२०१४). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक क्षेत्रामध्ये झिरो लिक्विड डिस्चार्ज सिस्टीमचा वापर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे विचाराधीन आहे काय,
(२) असल्यास, राज्यात २३ कॉमन इन्प्लुएन्ट ट्रीटमेंट प्लान्ट आहेत यापैकी फक्त ६ कॉमन इन्प्लुएन्ट ट्रीटमेंट प्लान्ट हे योग्य पद्धतीने कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्रातील सर्व पेपर मील मध्ये Volible Organic Chemicals Removed system लावण्याची सक्ती करण्याचा प्रस्ताव प्रलंबीत आहे काय,
(४) नसल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

श्री. रामदास कदम (१०-०७-२०१५) :(१) नाही.
(२) राज्यात एकूण २४ औद्योगिक सामाईक सांडपाणी संयंत्रणा कार्यान्वित असून त्यापैकी ०९ यंत्रणा व्यवस्थितरित्या काम करतात.
(३) व (४) पेपर उद्योगातून निर्माण होणारे सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी आधुनिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बसविणे, प्रक्रियाकृत सांडपाण्याची गुणवत्ता विहित मर्यादेत ठेवणे तसेच प्रक्रियाकृत सांडपाण्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.